सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १७
# मुंबई वकील अधिनियम, १९२०

(दिनांक १ मे १९७० पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे)

# BOMBAY ACT No. XVII OF 1920
# THE BOMBAY PLEADERS ACT, 1920

*(As modified upto 1st May 1970)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई ४०० ००४ यांचेद्वारे मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण आणि लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांचेद्वारे प्रकाशित.

१९९२

[किंमत—२.०० रुपये]

# मुंबई वकील अधिनियम, १९२०

## अनुक्रमणिका


प्रस्तावना

कलमे—

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. [निरसित.]

४. [निरसित.]

५. सनदांची व्याप्ती व हस्तांतरण.

६. [निरसित.]

७. उच्च न्यायालयाच्या वकिलांना कोठे व्यवसाय करण्याचा हक्क आहे.

८. जिल्ह्याच्या वकिलांना कोठे व्यवसाय करण्याचा हक्क आहे.

८अ. भारतीय संस्थानांत व्यवसाय करणाऱ्या अनर्ह वकिलांना निर्बंधित सनदा देण्याचा हक्क असणे.

९. अनधिकृत व्यक्तींनी दिवाणी न्यायालयात हजर राहणे निषिद्ध.

१०. [निरसित.]

११. प्रतिधारण फी.

१२. वकिलांना न्यायालयाच्या परवानगीवाचून आपल्या अशिलाविरुद्धच्या पक्षकाराकरिता काम करता येणार नाही आणि आपल्या अशिलाच्या वतीने काम करण्याचे नाकारता येणार नाही.

१३. दस्तऐवजांची पावती देणे.

१४. विवक्षित प्रकरणे सोडून एरव्ही कार्यवाहीकरिता निश्चित केलेल्या दिवशी उपस्थित राहणे, हे वकिलांवर बंधनकारक असणे.

१५. वकिलाने अडत देऊ नये किंवा घेऊ नये.

१६. वकिलांनी आपले अशील किंवा अधिकृत अभिकर्ता सोडून इतरांकडून अनुदेश न घेणे किंवा दलालामार्फत नेमणूक न स्वीकारणे.

१७. [निरसित.]

१८. निर्धारित फीची संगणना.

१९. [निरसित.]

२०. दोन वकिलांची फी केव्हा निर्धारित करता येईल.

२१. ज्या बाबतीत सारखाच हितसंबंध असणारे किंवा सारखाच बचाव देणारे अनेक पक्षकार असतील अशा बाबी.

२२. उच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलांच्या परिव्ययाचे निर्धारण.

२३. मुफसल न्यायालयातील परिव्ययाचे निर्धारण.

२४. [निरसित.]

२५. [निरसित.]

२६. [निरसित.]

२७. [निरसित.]

२८. [निरसित.]

२९. निर्धारित केलेल्या फीची वसुली.

३०. निर्धारित केलेल्या फीबाबत धारणाधिकार.

३१. नियम.

३२. व्यावृत्ति.

३३. प्रलंबित खटले.

३४. निरसन.

**अनुसूची एक.**

**अनुसूची दोन.**

**अनुसूची तीन.**

# सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १७[1]

[मुंबई वकील अधिनियम, १९२०]†

[१३ डिसेंबर १९२०]

हा अधिनियम, पुढील अधिनियमांन्वये अंशतः निरसित करण्यात आला :—

सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.

सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.

या अधिनियमात, पुढील अधिनियम व आदेश या अन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११;

सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६;

सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८;

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७*

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ अन्वये अंशतः निरसित करण्यात आला.

**मुंबई इलाख्यातील वकिलांच्या संबंधातील कायदा एकत्रित करणे व सुधारणे यांकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई इलाख्यातील वकिलांच्या संबंधातील कायदा एकत्रित करणे व सुधारणे इष्ट आहे; आणि ज्याअर्थी प्रस्तुत अधिनियम पारित करण्यासाठी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट, १९१५, कलम ७९, पोटकलम (२) अन्वये आवश्यक असलेली गव्हर्नर जनरल यांची पूर्वमंजुरी मिळवण्यात आली आहे;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी सन १९२० चे मुंबई सरकारचे राजपत्र, भाग पाच, पृष्ठ ४२० (इंग्रजी) पहा; प्रवर समितीच्या अहवालासाठी सन १९२० चे मुंबई सरकारचे राजपत्र, भाग पाच, पृष्ठ ७९४ (ए) (इंग्रजी) पहा; आणि विधानपरिषदेतील कामकाज वृत्तासाठी सन १९२० चे मुंबई सरकारचे राजपत्र, भाग पाच, पृष्ठे ६७१ व ९७१ (इंग्रजी) पहा.

†सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास तो लागू करण्यात आला आहे. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ३ पहा.)

*हा अधिनियम निरसित करण्यात आला आणि पुन्हा अधिनियमित करण्यात आला आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९, अनुसूची ई अन्वये केलेल्या सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ अन्वये अंमलात असण्याचे चालू राहिले.

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात आले आहे :--

संक्षिप्त नाव व व्याप्ती. १. (१) या अधिनियमास मुंबई वकील अधिनियम, १९२० असे म्हणावे.

[१][(२) तो संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

‡(३) मुंबई राज्याच्या ज्या भागात तो, मुंबई वकील (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५८ याद्वारे लागू करण्यात आलेला आहे त्या भागात, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील अशा तारखेस अंमलात येईल.] १९५८ चा मुंबई ५५.

व्याख्या. २. विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,--

(१) "उच्च न्यायालय" म्हणजे मुंबई येथील उच्च न्यायालय;

(२) "उच्च न्यायालयास दुय्यम असलेले न्यायालय" म्हणजे ज्याचा हुकूमनामा, आदेश, निर्णय किंवा निवाडा हा उच्च न्यायालयाच्या अपिलीय किंवा पुनरीक्षण अधिकारितेच्या अधीन असेल किंवा यानंतर अधीन राहील, असे कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा व्यक्ती;

(३) "वकील" म्हणज या किंवा पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाखाली दाखल करून घेतलेला वकील, आणि तीत [३][बृहन्मुंबई] खेरीज करून इतरत्र पक्षकारांकरिता हजर राहणाऱ्या, वकिली करणाऱ्या किंवा काम करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या न्यायवादीचा समावेश होतो, पण कलमे ३, ४, ५, ६, ११, १२, १३, २४, २५, २७ किंवा ३० यांतील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयाच्या न्यायवादीस लागू असणार नाही;

(४) "जिल्हा" म्हणजे उच्च न्यायालयाहून अन्य अशा, मूळ अधिकारिता असलेल्या मुख्य दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दी;

(५) "एकस्व पत्र" म्हणजे त्यात केलेल्या कोणत्याही सुधारणांच्या आणि फेरफारांच्या किंवा त्यातील खंड ४४ किंवा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या कलम १०६ (१ अ) यास अनुसरून, यात यानंतर करावयाच्या सुधारणांच्या आणि फेरफारांच्या अधीन असलेले, दिनांक २८ डिसेंबर १९६५ चे मुंबई इलाख्यासाठी काढलेले उच्च न्यायालयाचे सुधारित एकस्व पत्र;

(६) "विहित" म्हणजे या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले.

३. [वकिलांचे वर्ग.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (२) (ब) द्वारे निरसित करण्यात आले.

४. [सनद.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (२) (ब) द्वारे निरसित करण्यात आले.

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये पोटकलम (२) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

‡महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये पोटकलम (३) फेरबदल न होता राहिले आहे.

३. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९, अनुसूची ई आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ चे परंतुक यांअन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

५. (१) कोणत्याही जिल्हा वकिलाला एकाच वेळी एकाहून अधिक जिल्ह्यांकरिता सनद धारण करता येणार नाही : सनदांची व्याप्ती व हस्तांतरण.

[1][परंतु, ज्या जिल्ह्यांकरिता सनद द्यावयाची असेल त्या जिल्ह्यांत, ज्या क्षेत्राच्या महसूल प्रशासना-च्या किंवा फौजदारी न्यायदानासंबंधीच्या प्रयोजनांसाठी किंवा या दोन्ही प्रयोजनांसाठी कोणत्याही इतर जिल्ह्यातही समावेश करण्यात आला असेल असे क्षेत्र येत असेल तेव्हा अशा दोन्ही जिल्ह्यांच्या संबंधात सनद धारण करता येईल.]

(२) कोणत्याही [2*]जिल्ह्याकरिता उपलब्ध असणारी सनद धारण करणाऱ्या जिल्हा वकिलाने अर्ज केल्यावर, उच्च न्यायालयास वेळोवेळी अशा सनदेवर पृष्ठांकन करून, ती कोणत्याही इतर जिल्ह्याकरिता उपलब्ध करून देता येईल.

(३) कोणत्याही जिल्ह्याच्या संबंधात सनद धारण करणाऱ्या वकिलास, कोणत्याही इतर जिल्ह्याच्या न्यायालयातील कोणत्याही विशिष्ट दिवाणी कार्यवाहीत, अशा इतर जिल्ह्यातील जिल्हा न्यायाधीशाच्या लेखी पूर्वप्राधिकारपत्राने, पक्षकाराकरिता हजर राहता येईल, प्रतिवाद करता येईल किंवा काम चालवता येईल.

६. [दाखल करून घेण्याच्या शर्ती.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (२) (ब) अन्वये निरसित करण्यात आले.

७. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीनतेने आणि उच्च न्यायालयात व्यवसाय करण्याच्या उच्च न्यायालयातील वकिलांच्या हक्कासंबंधाने एकस्व पत्राच्या खंड १० खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने उच्च न्यायालयाच्या वकिलास पुढील ठिकाणी व्यवसाय करण्याचा हक्क असेल :— उच्च न्याया-लयाच्या वकिलांना कोठे व्यवसाय करण्याचा हक्क आहे.

(अ) उच्च न्यायालयात ;

(ब) उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या अन्य कोणत्याही न्यायालयात;

१८९८ चा मुंबई ४. (क) [3]मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ खाली रचना केलेल्या अपील न्यायाधिकरणात;

(ड) उच्च न्यायालयाच्या वकिलांना कायद्यान्वये ज्यामध्ये किंवा ज्यापुढे व्यवसाय करण्याचा हक्क आहे किंवा यानंतर असेल, अशा कोणत्याही इतर न्यायालयात किंवा न्यायालयापुढे, न्यायाधिकरणात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा व्यक्तीपुढे; आणि

(ई) पुढील कोणत्याही कार्यवाहीत कोणत्याही लोक अधिकाऱ्यांपुढे :—

१८७४ चा मुंबई ३. मुंबई वंशपरंपरागत अधिकारपद अधिनियमाच्या कलम ७३ च्या पहिल्या परिच्छेदानुसार केलेल्या अन्वेषणात आणि कलम ७७ खाली केलेल्या अपिलात ;

१८७९ चा मुंबई ५. मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या कलम ८७ खालील कार्यवाहीत ;

१९१५ चा मुंबई १. मुंबई नगररचना अधिनियम, १९१५ खाली लवादी न्यायाधिकरणापुढील कार्यवाहीत;

---

१. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ (१) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२* वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये "एक" हा शब्द वगळण्यात आला.

३. हा अधिनियम ज्या सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६ अन्वये निरसित करण्यात आला, तोही अधिनियम, सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ अन्वये निरसित करण्यात आला.

[1][ [2][राज्य] शासन] [3][शासकीय राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा [4][ज्या क्षेत्रात हा अधिनियम लागू होतो त्या क्षेत्रात] अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखालील अशा कार्यवाहीत.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह, उच्च न्यायालयाच्या न्यायवादीस लागू असतील.

जिल्ह्याच्या वकिलांना कोठे व्यवसाय करण्याचा हक्क आहे.

८. [5][१] त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या अधीनतेने [6][आणि पोटकलम (२) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही] जिल्हा वकिलास, त्याने, ज्या जिल्ह्याच्या [7][किंवा जिल्ह्यांच्या] संबंधात सनद धारण केलेली असेल त्या जिल्ह्यातील [7][किंवा जिल्ह्यांतील] —

(अ) जिल्हा न्यायाधीश त्यास वेळोवेळी नेमून देईल अशा एका किंवा अधिक दिवाणी न्यायालयात ;

[8][(ब) सत्र न्यायाधीश त्यास वेळोवेळी नेमून देईल अशा एका किंवा अधिक फौजदारी न्यायालयात ; ]

(क) यापुढे जिल्हा वकिलांना ज्या इतर कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायालयापुढे, न्यायाधिकरणात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा व्यक्तीपुढे वकिली करण्याचा कायद्याने हक्क आहे किंवा यानंतर प्राप्त होऊ शकेल तेथे; आणि

(ड) अशा इतर कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायालयापुढे, न्यायाधिकरणात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा व्यक्तीपुढे पुढीलपैकी कोणत्याही कार्यवाहीत, कोणत्याही लोक अधिकाऱ्या-पुढे :—

मुंबई वंशपरंपरागत अधिकारपद अधिनियमाच्या कलम ७३ च्या पहिल्या परिच्छेदानुसार केलेल्या अन्वेषणात आणि कलम ७७ खाली केलेल्या अपिलात ; १८७४ चा मुंबई ३.

मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, कलम ८७ खालील कार्यवाहीत ; १८७९ चा मुंबई ५.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "स्थानिक सरकार" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. वरील आदेशान्वये "मुंबई सरकार राजपत्र" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये "मुंबई इलाख्यात" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ६ (१) अन्वये कलम ८ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

७. सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम (४) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

८. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ६(१) (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

१९१५ चा मुंबई १. मुंबई नगररचना अधिनियम, १९१५ खालील लवादी न्यायाधिकरणापुढील कार्यवाहीत;

[1][[2][राज्य] शासन].[3][शासकीय राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, [4][हा अधिनियम लागू असलेल्या क्षेत्रात] अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखालील कार्यवाहीत व्यवसाय करण्याचा हक्क असेल.

[5][ (२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीनतेने उच्च न्यायालय, व्यवसाय करण्याचा हक्क जिच्यायोगे एखाद्या जिल्ह्यातील विवक्षित न्यायालयापुरता किंवा खटल्यांच्या विवक्षित वर्गापुरता निर्बंधित होईल अथवा अशा न्यायालयात व्यवसाय करण्याचा हक्क जिच्यायोगे निर्बंधित होईल अशी सनद पुढे नमूद केलेल्या रीतीने देऊ शकेल व व्यवसाय करण्याचा हक्क त्यानुसार निर्धारित करण्यात येईल :—

१८७९ चा १८. (अ) भूतपूर्व नागपूर उच्च न्यायालयाने विधि व्यवसायी अधिनियम, १८७९ याखाली तयार केलेल्या नियमांखाली ज्यांना वकील म्हणून दाखल करून घेतलेले आहे अशा भूतपूर्व मध्यप्रदेश राज्यातील मुख्त्यारांना, त्यांना संबंधित न्यायालयाच्या पूर्वपरवानगीनेच वकिली करता येईल, अशा रीतीने त्यांचा वकिली करण्याचा हक्क जिच्यायोगे निर्बंधित होईल, अशी सनद देता येईल.

१८७९ चा १३. (ब) भूतपूर्व हैदराबाद उच्च न्यायालयाने विधि व्यवसायी अधिनियम, १८७९ याखाली तयार केलेल्या नियमांखाली ज्यांना दाखल करून घेतलेले आहे अशा तृतीय श्रेणीच्या वकिलांना जिल्हा व सत्र न्यायालयाकडून कनिष्ठ असलेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयांतच आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी दर्जाच्या असलेल्या महसूल व सरकारी अधिकाऱ्यांपुढेच व्यवसाय करता येईल, अशा रीतीने त्याचा व्यवसाय करण्याचा हक्क जिच्यायोगे निर्बंधित होईल, अशी सनद देता येईल.

१८७९ चा १८ आणि १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश २. (क) भूतपूर्व सौराष्ट्र उच्च न्यायालयाने विधि व्यवसायी अधिनियम, १८७९ याखाली आणि सौराष्ट्र राज्यासाठी उच्च न्यायाधिकरण अध्यादेश, १९४८ याखाली तयार केलेल्या नियमांखाली ज्यास दाखल करून घेतलेले आहे अशा द्वितीय वर्ग मुखत्यारांना, जिल्हा न्यायालयाहून कनिष्ठ असलेल्या दिवाणी न्यायालयापुरताच आणि कनिष्ठ विभागाच्या दिवाणी न्याया-

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "स्थानिक सरकार" याऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "मुंबई सरकार राजपत्र" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये "मुंबई इलाख्यात" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ६ (२) अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

धीशाने न्यायचौकशी करण्याजोग्या खटल्यापुरताच त्यांचा विधि व्यवसाय करण्याचा हक्क जिच्यायोगे निर्बंधित होईल, अशी सनद देता येईल. तसेच अशा सनदांद्वारे, विधि व्यवसाय करण्याचा हक्क हा सत्र न्यायालयाहून कनिष्ठ असलेल्या फौजदारी न्यायालयात विधि व्यवसाय करण्यापुरता निर्बंधित करता येईल. ]

भारतीय संस्थानांत व्यवसाय करणाऱ्या संस्थाने विलीन झाल्याच्या अनर्ह (सनदी) वकिलांना निर्बंधित सनदा देण्याचा हक्क असणे.

[1][ ८अ. त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीनतेने भारतीय संस्थान प्रशासन आदेश, १९४८ याच्या अनुसूचीत दिलेल्या भारतीय संस्थानात जे व्यवसाय करीत होते व जे तात्पुरत्या सनदा धारण करीत होते व ज्या संस्थानात ते व्यवसाय करीत होते ती संस्थाने विलीन झाल्याच्या तारखेस ज्यांनी १० वर्षांहून कमी काळ व्यवसाय केलेला असेल अशा अनर्ह (सनदी) वकिलांचा व्यवसाय करण्याचा हक्क हा कोणत्याही विनिर्दिष्ट न्यायालयापुरता किंवा न्यायालयांपुरता निर्बंधित करणाऱ्या सनदा उच्च न्यायालय देऊ शकेल, अशा निर्बंधित सनदा मिळालेल्या वकिलांच्या संबंधाने व्यवसाय करण्याचा अधिकार त्यानुसार निर्धारित करण्यात येईल.]

अनधिकृत व्यक्तींनी दिवाणी न्यायालयात हजर राहणे निषिद्ध.

९. कोणतीही व्यक्ती, ती ह्या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे वकील नसेल आणि तिला कोणत्याही पक्षकाराकरिता कोणत्याही दिवाणी कार्यवाहीत हजर राहण्याचा, वकिली करण्याचा किंवा काम चालवण्याचा हक्क नसेल, आणि तिला रीतसर अधिकार देण्यात आलेला नसेल तर तिला कोणत्याही पक्षकाराकरिता, कोणत्याही न्यायालयातील दिवाणी कार्यवाहीत हजर राहता, वकिली करता, किंवा काम चालविता येणार नाही :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट—

(अ) स्वतःच्या वतीने हजर होणाऱ्या, वकिली करणाऱ्या किंवा काम चालविणाऱ्या किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३, नियम २ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे त्याच्या मान्यताप्राप्त अभिकर्त्याच्या वतीने हजर राहणाऱ्या किंवा काम चालविणाऱ्या कोणत्याही पक्षकारास, किंवा १९०८ चा ५.

(ब) उच्च न्यायालयाच्या कोणत्याही अधिवक्त्यास,

लागू असणार नाही.

१०. [वकालतनाम्याची आवश्यकता असणारी प्रकरणे.] सन १९२६ चा अधिनियम क्रमांक २२, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आले.

प्रतिधारण फी.

११. (१) वकिलास नेमणारा पक्षकार १ रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेची प्रतिधारण फी वकिलाला देईल.

(२) असे करण्यात पक्षकाराने कसूर केली असता वकील अशा फीची मागणी करील आणि ती फी देण्यात येईतोपर्यंत तो अशा पक्षकाराकरिता कोणतेही काम करणार नाही.

(३) अशी फी घेणारा प्रत्येक वकील [2][अशी फी तो घेईल त्यावेळी] त्याबाबत लेखी पावती, तीत फी मिळाल्याची तारीख विनिर्दिष्ट करून, देईल.

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसऱ्या अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१२. प्रतिधारण फी स्वीकारल्यानंतर कोणत्याही वकिलाला न्यायालयाच्या परवानगीवाचून—— वकिलांना न्यायालयाच्या परवानगी-वाचून आपल्या अशिला-विरुद्धच्या पक्षकारा-करिता काम करता येणार नाही आणि आपल्या अशिलाच्या वतीने काम करण्याचे नाकारता येणार नाही.

(अ) ज्या कोणत्याही पक्षाचा खटल्यातील हितसंबंध अशिलाच्या विरुद्ध असेल अशा कोणत्याही इतर पक्षकाराच्या वतीने हजर राहता, वकिली करता, किंवा काम चालविता येणार नाही, किंवा

(ब) आपल्या अशिलाच्या वतीने हजर राहण्याचे, वकिली करण्याचे किंवा काम चालवण्याचे नाकारता किंवा टाळता येणार नाही.

१३. आपल्या अशिलांकडून मिळालेला कोणत्याही प्रकारचा दस्तऐवज घेणारा प्रत्येक वकील,—— दस्तऐवजांची पावती देणे.

(अ) जेव्हा तो असा दस्तऐवज घेईल त्यावेळी, मागणी होताच त्याबाबत लेखी पावती देईल, आणि

(ब) त्याच्या अशिलाने अशा दस्तऐवजाची मागणी केली असता आणि त्याने त्याबद्दल लेखी पावती दिली तर असा दस्तऐवज कलम ३० च्या तरतुदींच्या अधीनतेने त्यास परत करील.

१४. (१) वकिलाने, त्याला ज्यासाठी नेमले असेल त्या कार्यवाहीच्या सुनावणीकरिता जो कोणताही दिवस रीतसर किंवा न्यायालयाच्या कार्यपद्धतीनुसार निश्चित केला असेल, त्या दिवशी न्यायालयात उपस्थित राहणे, हे त्याच्यावर बंधनकारक असेल. विवक्षित प्रकरणे सोडून एरव्ही कार्यवाही-करिता निश्चित केलेल्या दिवशी उपस्थित राहणे, हे वकिलांवर बंधनकारक असणे.

(२) कोणत्याही अशा कार्यवाहीत नेमलेला वकील, अस्वास्थ्यामुळे किंवा कोणत्याही इतर वाजवी सबबीमुळे अशा दिवशी किंवा कार्यवाहीसाठी नेमलेल्या वेळी हजर राहण्यास असमर्थ असेल तेव्हा, तो त्यासंबंधी न्यायालयास कळवील आणि लागोलाग न्यायालयास रास्त वाटेल अशा काळाकरिता ती कार्यवाही स्थगित करण्यात येईल :

परंतु ज्या कोणत्याही कार्यवाहीत पक्षकारांच्या वतीने एकापेक्षा अधिक वकील असतील आणि अशा वकिलांपैकी एक वकील उपस्थित असेल तर, अशा कार्यवाहीच्या बाबतीत, ती न्यायालयास पुढे चालू ठेवता येईल.

(३) ज्या कोणत्याही कार्यवाहीत, एखाद्या वकिलाने आपल्या अशिलाच्या वतीने काम करणे, त्याने शासकीय सेवा स्वीकारल्यामुळे किंवा कार्यवाहीतून अंग काढून घेण्याची त्यास परवानगी मिळाल्यामुळे किंवा त्यास निलंबित अथवा बडतर्फ करण्यात आल्यामुळे किंवा तो मृत्यू पावल्यामुळे किंवा कोणत्याही इतर कारणास्तव तात्पुरते किंवा कायमपणे थांबले असेल तर, ती कार्यवाही न्यायालयाला वाजवी वाटेल अशा काळासाठी स्थगित करण्यात येईल.

१५. कोणताही वकील, कोणत्याही विधिविषयक कामकाजात त्याला स्वतःला किंवा कोणत्याही इतर वकिलाला नेमणूक मिळावी म्हणून किंवा नेमणूक मिळाल्याबद्दल कोणताही परितोष देऊ करणार नाही, देणार नाही, ठेवन घेणार नाही किंवा ठेवून घेण्यास संमती देणार नाही. वकिलाने अडत देऊ नये किंवा घेऊ नये.

वकिलांनी आपले अशील किंवा अधिकृत अभिकर्ता सोडून इतरांकडून अनुदेश न घेणे किंवा दलालामार्फत नेमणूक न स्वीकारणे.

१६. कोणताही वकील—

(अ) कोणत्याही कार्यवाहीत, ज्या पक्षकाराकरिता त्याला नेमले असेल त्या पक्षकाराखेरीज किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या अर्थांतर्गत अशा पक्षकाराचा मान्यताप्राप्त अभिकर्ता असेल अशा व्यक्तीखेरीज किंवा असा अनुदेश देण्याकरिता अशा पक्षकाराने प्राधिकृत केलेल्या अशा एखाद्या व्यक्तीखेरीज, इतर व्यक्तीकडून अनुदेश घेणार नाही, किंवा १९०८ चा ५.

(ब) दलाल म्हणून ज्या व्यक्तीस उद्घोषित केले असेल त्याच्यामार्फत कोणत्याही विधिविषयक कामकाजात कोणतीही नेमणूक स्वीकारणार नाही.

१७. [खाजगी करारान्वये फी ठरविता येईल.] सन १९२६ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ६ अन्वये हे कलम निरसित करण्यात आले.

निर्धारित फीची संगणना.

१८. (१) कोणत्याही कार्यवाहीत पक्षकारास निवाड्याने परिव्यय देण्यात आला असेल तेव्हा, अशा पक्षकाराने त्याने वकिलामार्फत काम चालविलेले असेल तर, आपल्या प्रतिपक्षाकडून वसूल करावयाच्या परिव्ययाच्या बिलात निर्धारित करावयाच्या वकिलाच्या फीच्या रकमेची संगणना ही, अनुसूची तीन मधील नियमांनुसार करण्यात येईल. मात्र अशी फी [1][विधिव्यवसायी (फी) अधिनियम, १९२६, कलम ३ ] च्या तरतुदींखाली त्याहून कमी रकमेइतकी ठरवण्यात आलेली असेल तर ती बाब निराळी. अशा प्रकरणी, अशा कमी रकमेपेक्षा अधिक रक्कम वसूल करण्यात येणार नाही.

(२) या कलमाचे पोटकलम (१) किंवा कलम २० यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट मुंबईच्या लघुवाद न्यायालयातील वकिलांना द्यावयाच्या फीस लागू असणार नाही.

१९. [अशिलाने वकिलास द्यावयाची रक्कम.] सन १९२६ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आले.

दोन वकिलांची फी केव्हा निर्धारित करता येईल.

२०. (१) जेव्हा पक्षकाराने, कार्यवाहीच्या पहिल्या सुनावणीच्या पूर्वी, एकाहून अधिक वकील नेमले असतील तेव्हा, परिव्ययाच्या बिलांत दोन वकिलांची फी, पुढील बाबतीत निर्धारित करता येईल :—

(अ) ज्या दाव्याची रक्कम किंवा त्याच्या विषयवस्तूचे मूल्य [2][रु. १०,०००] हून अधिक असेल अशा उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयातील मूळ दाव्याच्या बाबतीत ;

(ब) [3][भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८६५], [4][संप्रमाणन व प्रशासन अधिनियम, १८८१] किंवा [4][भूमि संपादन अधिनियम, १८९४] याखाली उच्च न्यायालयास अधीन असलेल्या कोणत्याही न्यायालयात लढवलेल्या आणि ज्याची रक्कम किंवा विषयवस्तूचे मूल्य [2][रु. १०,०००] हून अधिक असेल अशा कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत ; १८६५ चा १०. १८८१ चा ५. १८९४ चा १.

---

१. सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २, पहिल्या अनुसूची अन्वये "१७" या आकड्याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम २(१) अन्वये "रु. ५,०००" याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

३. आता भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ पहा.

४. केंद्रीय अधिनियम.

(क) खंड (अ) किंवा खंड (ब) यात उल्लेखिलेल्या कोणत्याही प्रकारच्या दाव्याचा किंवा कोणत्याही लढवलेल्या कार्यवाहीचा त्याच्या गुणवत्तेवरून निर्णय करणाऱ्या हुकूमनाम्यावर उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही अपिलाच्या बाबतीत;

(ड) ज्या कोणत्याही दाव्याची रक्कम किंवा त्याच्या विषयवस्तूचे मूल्य [1][रु. १०,००० किंवा त्याहून कमी असून] ज्यात, दोन वकिलांची फी निर्धारित करता येईल असे न्यायालय लेखी आदेशाद्वारे प्रमाणित करील, अशा कोणत्याही दाव्याच्या बाबतीत :

१८७९ चा १७. परंतु, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे नादारांनी केलेल्या दाव्यांना किंवा अपिलांना अथवा दक्षिण कृषक सहाय्य अधिनियम, १८७९ याअन्वये नियंत्रित होणाऱ्या दाव्यांना किंवा अपिलांना बाध येणार नाही.

(२) या कलमात विनिर्दिष्ट केलेली प्रकरणे खेरीज करून एकाहून अधिक वकील नेमणाऱ्या पक्षकारास त्याच्या प्रतिपक्षाकडून एका वकिलास मिळावयाच्या फीपेक्षा अधिक काहीही वसूल करण्याचा हक्क असणार नाही.

ज्या बाबतीत सारखाच हितसंबंध असणारे किंवा सारखाच बचाव देणारे अनेक पक्षकार असतील अशा बाबी.

२१. जेव्हा कोणत्याही कार्यवाहीत सारखाच हितसंबंध असणारे किंवा सारखाच बचाव देणारे अनेक पक्षकार असतील तेव्हा त्यांना निवाड्याने परिव्यय देवविण्यात आला तर, न्यायालयाने अन्यथा निदेश दिला असेल ते खेरीज करून एरव्ही उभय पक्षासंबंधाने करावयाच्या निर्धारणामध्ये एका वकिलास मिळावयाच्या फीपेक्षा जास्त फी अंतर्भूत करता येणार नाही.

उच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलांच्या परिव्ययाचे निर्धारण.

२२. उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही दिवाणी अपिलात किंवा अर्जात, उच्च न्यायालयाने उभय पक्षकारांसंबंधाने परिव्ययाबाबत निवाडा दिलेला असेल तर, अशा परिव्ययाचे निर्धारण हे उच्च न्यायालयाचा अधिकारी करील आणि त्याचा समावेश या न्यायालयाच्या हुकूमनाम्यास किंवा आदेशास जोडलेल्या परिव्ययाच्या बिलात विहित पद्धतीने करील.

मुफसल न्यायालयांतील परिव्ययाचे निर्धारण.

२३. [2][बृहन्मुंबई] खेरीज इतरत्र असलेल्या उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या कोणत्याही मुफसल न्यायालयात, त्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यास किंवा आदेशास जोडलेल्या परिव्ययाच्या बिलात निर्धारित करावयाची वकिलाच्या फीची रक्कम, अनुसूची तीनमधील नियमांनुसार संगणित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

१९१३ चा ७. परंतु, ह्या कलमातील कोणतीही गोष्ट [3] भारतीय कंपनी अधिनियम, १९१३ याच्या तरतुदीअन्वये तयार केलेल्या परिव्यय बिलास लागू असणार नाही.

---

१. सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम २(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९, अनुसूची "ई" आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ च्या परंतुकान्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. केंद्रीय अधिनियम.

२४. [फौजदारी गुन्ह्यांच्या अपराधसिद्धीनंतर उच्च न्यायालयाने वकिलास निलंबित करणे किंवा काढून टाकणे.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (४) (ब) अन्वये निरसित करण्यात आले.

२५. [अयोग्य वर्तणुकीबद्दल उच्च न्यायालयाने वकिलास शिक्षा देणे.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (४) (ब) अन्वये निरसित करण्यात आले.

२६. [वकिलाच्या अयोग्य वर्तणुकीसंबंधाने जिल्हा न्यायालयाचे किंवा सत्र न्यायालयाचे अधिकार.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (४) (ब) अन्वये निरसित करण्यात आले.

२७. [वकिलांविरुद्ध उच्च न्यायालयात प्रकरण चालवणे.] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ५० (४) (ब) अन्वये निरसित करण्यात आले.

२८. [वकिलांविरुध्द विधि कार्यवाही करण्यास बाध येणार नाही.] सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आले.

निर्धारित फीची वसुली.

२९. ज्याच्या परिव्ययाच्या बिलाचे निर्धारण करण्यात आले असेल अशा वकिलास, ज्या न्यायालयाने केलेल्या किंवा ज्या न्यायालयाच्या अधिकाऱ्याने असे निर्धारण केले असेल त्या न्यायालयाकडे, निर्धारण होऊन मिळावयाच्या एकूण रकमेबद्दल किंवा येणे असेल अशा रकमेबद्दल आपल्या अशिलासंबंधात आदेश व्हावा म्हणून अर्ज करता येईल. न्यायालय असा आदेश देऊ शकेल किंवा त्या वकिलास दावा लावण्यास सांगू शकेल.

अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी ही दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश २१ खालील पैशांबाबतच्या हुकूमनाम्याप्रमाणे करता येईल. १९०८ चा ५.

निर्धारित केलेल्या फी-बाबत धारणाधिकार.

३०. ज्या परिव्ययाचे निर्धारण केलेले असेल किंवा निर्धारण करता येण्याजोगे असेल अशा, वकिलास त्याच्या अशिलाकडून येणे असलेल्या परिव्ययाच्या प्रत्येक बाबतीत, वकिलास, आपल्या अशिलाच्या संबंधात निर्धारण केलेल्या अशा परिव्ययाच्या रकमेबद्दल —

(अ) अशा बाबतीत त्याच्या नेमणुकीच्या ओघात जे दस्तऐवज त्याच्या कब्जात आले असतील आणि ज्याबाबत कलम १३ (अ) च्या तरतुदीअनुसार त्याने पावती दिलेली असेल, अशा सर्व दस्तऐवजांवर आणि

(ब) अशा बाबतीत, त्याच्या प्रयत्नाने परत मिळालेल्या किंवा जतन करून ठेवलेल्या सर्व जंगम मालमत्तेवर—

धारणाधिकार असण्याचा त्यास हक्क असेल.

३१. (१) उच्च न्यायालयास, पुढील बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे नियम करता येतील :— नियम.

(अ) वकिलांच्या अर्हता आणि त्यांना दाखल करून घेण्याची पद्धती आणि दाखल करून घेण्याबद्दल देय असलेली फी विहित करणे;

(ब) वकिलाच्या अधिकारपदाकरिता घ्यावयाच्या परीक्षांच्यासंबंधात (कोणत्याही असल्यास) देय असलेली फी विहित करणे;

(क) वकील अधिसंघाचे विनियमन करणे आणि त्यांना मान्यता देण्याबाबत आणि अशा अधिसंघांच्या नियमांना मंजुरी देण्याबाबत तरतूद करणे;

(ड) वकील हा, वकील अधिसंघाचा सदस्य असण्याचे आणि त्याने वकील अधिसंघाच्या नियमाप्रमाणे वागण्याचे आवश्यक करणे ;

(ई) वकील, तो ज्या मुख्य न्यायालयात व्यवसाय करीत असेल त्या न्यायालयास संलग्न असलेल्या विधि ग्रंथालयाचा सदस्य असण्याचे आणि त्याने त्याची वर्गणी भरण्याचे आवश्यक करणे ;

(फ) उभय पक्षकारांमध्ये परिव्यय निर्धारित करण्याबाबत तरतूद करणे;

(ग) वकील आणि त्याचा अशील यांमधील परिव्यय–मग तो विवादप्राप्य असो किंवा विवादेतर कामकाजापासून प्राप्य असो–देवविण्याबाबत आणि त्याचे निर्धारण करण्याबाबत तरतूद करणे ;

(ह) अनुसूची दोनमधील नमुन्यांच्या ऐवजी वकिलास द्यावयाच्या सनदेचा आणि वकालतनाम्याचा नमुना विहित करणे ;

(आय) अनुसूची तीनमधील नियमांच्या ऐवजी किंवा त्यांच्या भरीला ज्या रीतीने वकिलाची फी संगणित करण्यात येईल, ती रीत आणि वकिलाची फी परिगणित करण्याच्या प्रयोजनार्थ, विशिष्ट वर्गाच्या खटल्यातील किंवा सरसकट खटल्यातील विषयवस्तूंची रक्कम किंवा मूल्य निर्धारित करणे ;

(जे) उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयांनी केलेल्या हुकूनाम्यांवर किंवा दिलेल्या आदेशांवर उच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलांत किंवा अर्जात जेव्हा उभय पक्षकारांमधील परिव्ययाबाबत उच्च न्यायालयाने निवाडा दिला असेल त्याबाबतीत ज्या रीतीने खर्चाचे निर्धारण केले पाहिजे, ती रीत विहित करणे ;

(के) कलम २७, पोटकलम (२) खालील प्रकरणांत, ज्या परिव्ययाचा निवाडा देण्यात येईल त्या परिव्ययाचे प्रमाण निश्चित करणे ;

(ल) सर्वसाधारणपणे, ज्याबाबत नियमांद्वारे तरतूद करणे आवश्यक असेल अशा, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे ;

(२) जेव्हा उच्च न्यायालय, अनुसूची दोनमधील नमुन्यांऐवजी कोणतेही नवीन नमुने विहित करील किंवा अनुसूची तीनमधील नियमांऐवजी किंवा त्या नियमांच्या भरीला आणखी कोणतेही नवीन नियम करील तेव्हा, अनुक्रमे असे नवीन नमुने किंवा नियम प्रसिद्ध केल्यावर ते अशा अनुसूचीत त्यात सध्या असलेल्या नमुन्यांच्या किंवा नियमांच्या ऐवजी किंवा त्यांच्या भरीला अधिनियमित करण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम, [1][शासकीय राजपत्रात] प्रसिद्ध करण्यात येतील आणि त्यानंतर ते जणू काही या अधिनियमात अधिनियमित करण्यात आलेले असावेत, त्याप्रमाणे ते परिणामक होतील.

३२. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१५ च्या कलम १०६ आणि १०७ याअन्वये किंवा एकस्व पत्राच्या खंड ९ आणि १० याअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये उच्च न्यायालयास प्रदान केलेले अधिकार मर्यादित होतात किंवा अन्यथा त्यास बाध येतो, असे मानले जाणार नाही. व्यावृत्ति.

३३. वकिलांची नेमणूक, हजर राहणे, किंवा त्यांचे पारिश्रमिक यांच्या संबंधातील किंवा परिश्रमाच्या निर्धारणाच्या संबंधातील या अधिनियमातील कोणतीही गोष्ट या अधिनियमाच्या प्रारंभी कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीस लागू असणार नाही. आणि अशा सर्व कार्यवाह्या ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयाकडून त्यांची अंतिम विल्हेवाट करण्यात येईतोपर्यंत अशा गोष्टींबाबत या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या विधीस आणि नियमास अनुसरून चालवण्यात येतील. प्रलंबित खटले.

३४. अनुसूची एकमध्ये उल्लेख केलेल्या अधिनियमिती अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या व्याप्तीपर्यंत या अन्वये निरसित करण्यात आल्या आहेत. निरसन.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "मुंबई सरकारचे राजपत्र" या ऐवजी "शासकीय राजपत्र" हे शब्द दाखल करण्यात आले.

## अनुसूची एक

(कलम ३४ पहा)

| अधिनियमितीचा क्रमांक आणि दिनांक (१) | शीर्षक (२) | निरसनाची व्याप्ती (३) |
|---|---|---|
| सन १८२७ चा मुंबई विनियम २ | दिवाणी न्यायदानासंबंधातील न्यायालयांची रचना आणि त्यांचे न्यायाधीश व अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये परिनिर्धारित करण्याबाबत विनियम. | जातीसंबंधीच्या प्रश्नात दिवाणी न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास मनाई करण्याबाबतचा कलम २१ चा भाग सोडून जो भाग अगोदरच निरसित करण्यात आला नसेल तो भाग. |
| सन १८४६ चा अधिनियम १ | ईस्ट इंडिया कंपनीच्या न्यायालयात वकिलांची नेमणूक करण्याबाबतच्या आणि त्यांचे पारिश्रमिक ठरविण्याबाबतच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | कलम ५ सोडून संपूर्ण भाग. |
| सन १८५३ चा अधिनियम २० | ईस्ट इंडिया कंपनीच्या न्यायालयातील वकिलांच्या संबंधातील कायद्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | कलम ३. |

## अनुसूची दोन

### नमुना अ

**उच्च न्यायालयाच्या वकिलाकरिता सनद**

(सुधारित एकस्व पत्राचा खंड १० आणि मुंबई वकील अधिनियम, १९२० याचे कलम ४)

[1][उच्च न्यायालय], अपील शाखा, मुंबई.

मुंबई, .......... १९.......

.................................. यांस,

मुंबई येथील उच्च न्यायालयाची रचना करणाऱ्या आणि ................ तारखेस प्रसिद्ध केलेल्या सुधारित एकस्व पत्राच्या खंड १० च्या तरतुदींखाली केलेल्या नियमांस अनुसरून आणि मुंबई वकील अधिनियम १९२० याच्या तरतुदींस अनुसरून आपणास म्हणजे ................... यांस, याद्वारे उक्त उच्च न्यायालयाचे वकील म्हणून मान्यता देण्यात, दाखल करून घेण्यात, आणि आपली नावनोंदणी करण्यात येत आहे आणि वाजवी कारणास्तव असेल ते खेरीज करून एरव्ही आपण काढून टाकले जाण्यास किंवा आपला व्यवसाय निलंबित केला जाण्यास पात्र असणार नाही.

मुंबई येथील [1][उच्च न्यायालय] यांच्या आदेशान्वये.

उप प्रबंधक,

(उच्च न्यायालयाची मोहोर)

मोहोर अधिकारी

दिनांक १९

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "हिज मॅजेस्टीज हाय कोर्ट" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

## नमुना ब

### जिल्हा वकिलाकरिता सनद

(मुंबई वकील अधिनियम, १९२०, कलम ४)

[1][उच्च न्यायालय] अपील शाखा, मुंबई.

मुंबई, ........ १९ ....

.................................... यांस,

मुंबई वकील अधिनियम, १९२० च्या तरतुदींना अनुसरून आपणांस याद्वारे ............ जिल्ह्यात जिल्हा वकील म्हणून नेमण्यात येत आहे, वाजवी कारणास्तव असेल ते खेरीज करून एरव्ही आपण काढून टाकले जाण्यास किंवा आपला व्यवसाय निलंबित केला जाण्यास पात्र असणार नाही.

मुंबई येथील [1][उच्च न्यायालय] न्यायाधिकरणाच्या आदेशान्वये.

उप प्रबंधक.

(उच्च न्यायालयाची मोहोर)

मोहोर अधिकारी

दिनांक १९

---

[नमुना "क" वकालतनामा] सन १९२६ चा अधिनियम २२, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

---

## अनुसूची तीन

(कलम १८ पहा)

### वकिलाची फी संगणित करण्याबाबत नियम

१. [2][नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने]—

(अ) ज्या दाव्यांमधील पक्षकारांतील खऱ्या विवादाचा निकाल गुणवत्तेवरून करण्यात येतो, अशा दाव्यांत,

(ब) ज्या हुकूमनाम्यांत पक्षकारांतील खऱ्या विवादाचा निकाल गुणवत्तेवरून करण्यात येतो, अशा दरखास्तीतील कार्यवाहीवरील अपिलांहून अन्य अशा हुकूमनाम्यांवरील (प्रारंभिक हुकूमनामे धरून) अपिलांत,

(क) [3][(एक) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५, त्यातील नियम पाच, खंड (ई), उपखंड (२) आणि (३) यांच्या कक्षेत येणारे अर्ज किंवा अपिले खेरीज करून],

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "हिज मॅजेस्टीज हाय कोर्ट" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट १९३५ अन्वये हे शब्द आणि आकडे समाविष्ट करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २५३९, दिनांक २३ डिसेंबर १९३२ अन्वये मूळ उपखंड (एक) व (दोन) ऐवजी उपखंड (एक) दाखल करण्यात आला.

[1][ (दोन) ] भूमि संपादन अधिनियम, १८९४

याखाली केलेल्या अर्जात किंवा कार्यवाह्यांत, वकिलांच्या फीची रक्कम ही, दावा, अपील, अर्ज किंवा कार्यवाह्या यांतील विवादातील विषयवस्तूच्या रकमेवर किंवा मूल्यावर खाली विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी संगणित करण्यात येईल :—

[2][विवादातील विषयवस्तूची रक्कम किंवा मूल्य रुपये २,००० हून अधिक नसेल तर, ५ टक्के दराने.

रक्कम किंवा मूल्य रुपये २,००० हून अधिक, परंतु रुपये ५,००० हून अधिक नसेल तर, रुपये २,००० वर वरीलप्रमाणे आणि बाकी रकमेवर ३ टक्के दराने.].

अशी रक्कम किंवा मूल्य रुपये ५,००० हून अधिक परंतु रुपये १०,००० हून अधिक नसेल तर, रुपये ५,००० वर वरीलप्रमाणे आणि बाकीच्या रकमेवर २ टक्के दराने.

अशी रक्कम किंवा मूल्य रुपये १०,००० हून अधिक परंतु रु. २०,००० हून अधिक नसेल तर, रुपये १०,००० वर वरीलप्रमाणे आणि बाकीच्या रकमेवर १ टक्का या दराने.

अशी रक्कम किंवा मूल्य रुपये २०,००० हून अधिक असेल तर, रुपये २०,००० वर वरीलप्रमाणे आणि बाकीच्या रकमेवर ½ टक्का दराने.

[3][अपवाद—[4][पूर्वोक्ताच्या अधीनतेने] जमीनदार आणि कूळ यांच्या दरम्यानच्या दाव्यातील, अपिलातील, अर्जातील किंवा कार्यवाहीतील वकिलांची फी, न्यायालय फीच्या प्रयोजनांसाठी असलेल्या हक्कमागणीच्या रकमेवर किंवा मूल्यावर परिगणित करण्यात येईल, अधिकारितेच्या प्रयोजनांसाठी असलेल्या हक्कमागणीच्या रकमेवर किंवा मूल्यावर नव्हे :

परंतु, प्रकरण तयार करण्यास लागणाऱ्या श्रमांचा किंवा त्यात उद्‌भवणाऱ्या मुद्यांच्या जटिलतेचा विचार केला असता, मूल्यांकनाचा दर अधिक असणे योग्य होईल असे न्यायालयाचे मत होईल तर, न्यायालयास विवेकाधिकारानुसार ती रक्कम, अधिकारितेच्या प्रयोजनासाठी हक्कमागणीच्या रकमेवर किंवा मूल्यावर परिगणित करता येईल.]

(दोन) [5][नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने]—

(अ) आदेशावर केलेल्या अपिलात,

(ब) दावा किंवा अपील चालविण्यास आवश्यक असलेले अर्ज आणि कार्यवाह्या आणि नियम एक, चार, आणि पाच यांखाली येणारे अर्ज, कार्यवाह्या किंवा अपिले यांहून अन्य अशा दिवाणी अर्जात किंवा कार्यवाह्यांत, आणि

(क) अन्यथा तरतूद न केलेल्या इतर सर्व खटल्यांत

द्यावयाची वकिलाच्या फीची रक्कम, नियम एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनुसार देय रकमेच्या एक चतुर्थांश असेल.

(तीन)—[5][नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने] नियम एक आणि दोन यांत विहित केलेली फी ही दावा, अपील, अर्ज, निर्देश किंवा कार्यवाही यातील अंतिम हुकूमनामा किंवा आदेश देण्यात येईतोपर्यंत, वकिलाच्या कामाचे पारिश्रमिक म्हणून समजण्यात येईल.

---

१. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २५३९, दिनांक २३ डिसेंबर, १९३२ अन्वये उपखंड (दोन) यास उपखंड (तीन) असा फेरक्रमांक देण्यात आला.

२. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक एक्स ९१२६/४२, दिनांक २२ जून, १९४४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा भागांश दाखल करण्यात आला.

३. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०२५, दिनांक २८ मार्च, १९२८ अन्वये अपवाद त्यांच्या परंतुकासह समाविष्ट करण्यात आला.

४. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट, १९३५ अन्वये "पूर्वोक्ताच्या अधीनतेने" हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

५. वरील अधिसूचनेअन्वये "नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने" हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(चार) [1][नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने दरखास्तीतील कार्यवाह्यांत बाबयाची वकिलाची फी ही] हुकूमनाम्याची बजावणी व्हावी यासाठी केलेल्या अर्जात हक्कमागणी केलेल्या अनुतोषाच्या किंवा पैशाच्या रकमेवर किंवा मूल्यावर नियम एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने परिगणित फीच्या एक-चतुर्थांश इतकी असेल. [2][अशी फी पहिल्या अर्जावर आणि हरकत घेणाऱ्या प्रत्येक तदनंतरच्या अर्जावर आकारण्याजोगी असेल.]

(पाच) [1][नियम सहाच्या तरतुदींच्या अधीनतेने]—

(अ) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम ११३ खाली उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही निर्देशात,

(ब) उक्त संहितेच्या कलम ११५ खाली उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही अर्जात,

(क) प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७, कलम २५ खाली उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही अर्जात,

(ड) दिवाणी कामात उच्च न्यायालयाने आपल्या असाधारण अधिकारितेचा वापर करण्यासाठी केलेल्या कोणत्याही अर्जात,

(ई) (एक) पालक व पाल्याधिकरण अधिनियम, १८९०,

[3][(दोन) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५, भाग दहा,

(तीन) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५, भाग सात],

(चार) भारतीय न्यास अधिनियम, १८८२,

(पाच) प्रांतिक नादारी अधिनियम, [4][१९२०],

(सहा) कोणताही इतर विशेष किंवा स्थानिक अधिनियम,

यांखालील सर्व अर्जात किंवा अपिलांत वकिलाची फी म्हणून रु. ३० इतकी रक्कम देण्यास मुभा आहे.

[5][(सहा) दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ७५ च्या तरतुदींखाली ज्यांत राजादेश काढला असेल अशा सर्व दाव्यांत, अपिलांत, अर्जांत किंवा कार्यवाह्यांत वकिलाच्या फीमध्ये—

(अ) जर राजादेश काढला नसता तर दावा, अपील, अर्ज, किंवा कार्यवाही यास नियम (एक) ते (पांच) यांपैकी जो कोणताही नियम लागू होण्याजोगा असेल त्या नियमानुसार संगणित केलेली रक्कम,

(ब) आणि न्यायालय, आपल्या विवेकाधिकाराने परवानगी देईल अशा आयुक्तापुढे हजर राहण्याबद्दल प्रत्येक दिवसास रु. २० पेक्षा अधिक नसेल अशी फी, यांचा समावेश असेल :

परंतु,—

---

१. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट, १९३५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २१२४, दिनांक २८ एप्रिल, १९२५ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २५३९, दिनांक २३ डिसेंबर, १९३९ अन्वये मूळ उपखंडाऐवजी उपखंड (दोन) आणि (तीन) दाखल करण्यात आले.

४. वरील अधिसूचनेअन्वये "१९०७" या आकड्याऐवजी "१९२०" हा आकडा दाखल करण्यात आला.

५. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट, १९३५ अन्वये नियम सहा समाविष्ट करण्यात आला.

(एक) वकिलाने आयुक्तापुढे हजर राहण्याची जरुरी नाही असे न्यायालयाने राजादेश काढतेवेळी प्रमाणित केले असेल तर, आयुक्तापुढे हजर राहण्याबद्दल कोणतीही फी दिली जाणार नाही.

(दोन) परंतु आणखी असे की, जे शहर किंवा गाव राजादेश काढणाऱ्या न्यायालयाचे मुख्यालय असेल अशा शहरात किंवा गावात आयुक्तापुढे हजर राहण्याबद्दल कोणतीही फी दिली जाणार नाही.]

[1][सात] कोणत्याही बाबतीत—मग त्या संबंधात या अनुसूचीत विशेष किंवा अन्य कोणतीही तरतूद केलेली असो किंवा नसो, —कोणत्याही दिवाणी दाव्यात, अपिलात, अर्जात किंवा दरखास्तीच्या कार्यवाहीहून अन्य कार्यवाहीत द्यावयाची वकिलाची फी—

(अ) उच्च न्यायालयात रु. ३० हून,

(ब) जिल्हा न्यायालयात रु. १५ हून,

(क) खंड (ड) आणि त्या खालील परंतुकाच्या अधीनतेने दुय्यम न्यायाधीशांच्या न्यायालयात रु. १५ हून,

(ड) लघुवाद न्यायालयाने दखल घेण्याजोग्या दाव्याच्या बाबतीत दुय्यम न्यायाधीशांच्या न्यायालयात, किंवा सन १८३० च्या मुंबई विनियम १३ आणि सन १८४० चा अधिनियम क्रमांक १५ खाली क्षेत्राधिकार चालविणाऱ्या जहागीरदाराच्या किंवा इनामदाराच्या न्यायालयात किंवा मामलतदार न्यायालये अधिनियम, १९०६ खालील मामलेदारांच्या न्यायालयात रु. ५ हून कमी असणार नाही :

परंतु, वरिष्ठ धारकाने, त्यास येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी केलेले दावे, ते जमिनीच्या मालकी हक्कास बाध आणणारे असे वादग्रस्त प्रश्न ज्यात अंतर्भूत असतील अशा प्रकारचे दावे आहेत, असे न्यायालयाचे मत असेल तर, खंड (ड) अन्वये नियंत्रित होतील, खंड (क) अन्वये नव्हे :

[2][परंतु आणखी असे की, जर दाव्यात, अपिलात, अर्जात, किंवा कार्यवाहीत दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ७५ च्या तरतुदींखाली राजादेश काढण्यात आला असेल तर, या नियमाच्या प्रयोजनार्थ अशा दाव्यात, अपिलात, अर्जात किंवा कार्यवाहीत द्यावयाची वकिलाच्या फीची परिगणना करताना नियम (सहा), खंड (ब) च्या तरतुदींखाली द्यावयाची फी वगळण्यात येईल.]

---

१. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक ३११, दिनांक २६ जानेवारी, १९२९ अन्वये मूळ नियमाऐवजी नियम (सहा) दाखल करण्यात आला आणि नियम क्रमांक (सहा) ला उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट, १९३५ अन्वये नियम (सात) असा फेरक्रमांक देण्यात आला.

२. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक २०३६, दिनांक ३० ऑगस्ट, १९३५ अन्वये नियम सातचे हे परतुंक समाविष्ट करण्यात आले.

[१] [(आठ) यात यापूर्वी विहित करण्यात आलेल्या फीवर २५ टक्के अधिभार आकारणी करता येईल :

परंतु, अधिनियमाच्या कलम २०, पोटकलम एक, खंड (अ) आणि (ब) यांत उल्लेखिलेल्या दाव्यांत आणि कार्यवाह्यांत एकच वकील नेमला तर, असा अधिभार आकारता येणार नाही.]

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

१. उच्च न्यायालय (अपील शाखा) अधिसूचना क्रमांक पी. ४१२/५१ (दोन), दिनांक २४ एप्रिल, १९५३ अन्वये १ जून, १९५३ पासून नियम आठ जादा दाखल करण्यात आला.